पुढारी
शनिवार,
१८ जानेवारी २०२५

# ‘विवेकानंद’च्या विद्यार्थ्यांची कृषी महाविद्यालयास भेट

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी कृषी महाविद्यालयास शैक्षणिक अभ्यास भेट दिली. विवेकानंद कॉलेज व एलेक्झिट इन्ग्रेडिएंटस, कोल्हापूर यांच्या सहकार्याने ही भेट घडवून आणली गेली. भेटींतर्गत तेथील अधिकारी डॉ. कारंडे, डॉ. सरवदे, डॉ. पतंगे व डॉ. पाटील, विभागातील विद्यार्थ्यांनी जैविक खतनिर्मिती, गांडुळ खत निर्मिती, डेअरी प्रॉडक्ट् तसेच फळांपासून निर्माण केलेले विविध पदार्थ व त्यांची पाककृती याबद्दल माहिती दिली. प्रा. डॉ. अभिजित कासारकर यांनी भेटीचे नियोजन केले. यासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत
शनिवार
१८
जानेवारी २०२५

# नोकऱ्या घटणार, नव्या वाटा शोधाव्या लागतील

## अच्युत गोडबोले : 'एआय'चा होणार परिणाम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय)मुळे येत्या ५ ते १० वर्षांमध्ये जगभर सर्वच क्षेत्रात क्रांती होणार आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रांतील नोकऱ्या काही प्रमाणात कमी होतील, हे खरे असले तरी ज्यांना नावीन्यपूर्ण गोष्टी शिकण्याची आवड आहे. बदलत्या तंत्रज्ञानाला आत्मसात करून रोजगाराच्या नवनवीन वाटा शोधण्याचे कौशल्य ज्यांच्याकडे आहे, त्यांना काळजी करण्याचे काहीच कारण नाही, असा दिलासा लेखक अच्युत गोडबोले यांनी दिला. रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिडटाऊनच्या वतीने विवेकानंद महाविद्यालयात आयोजित व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते.

मिडटाउनच्या अध्यक्षा अरुंधती महाडिक यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम घेण्यात आला. व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी रोटरीचे सचिव बी. एस. शिंपुकडे, रमेश खटावकर, निवृत्त न्यायाधीश ए. व्ही. देशपांडे, प्राचार्य आर. आर. कुंभार, आदी उपस्थित होते.



कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद महाविद्यालयामध्ये रोटरी क्लब मिडटाउनच्या वतीने अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान झाले. यावेळी बी. एस. शिंपुकडे, रमेश खटावकर, ए. व्ही. देशपांडे, प्राचार्य आर. आर. कुंभार उपस्थित होते.

गोडबोले म्हणाले, संगणक आल्यानंतर सुरुवातीला अशीच भीती घातली जात होती. मात्र, आज संगणक जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. त्याचप्रमाणे एआयही जीवनातील महत्त्वपूर्ण भाग व्यापून टाकेल. आपण मशीनला जो डाटा पुरवतो, त्याच डाट्याचा वापर करून आवश्यक ती माहिती पुरवली जाते.

याच सूत्रानुसार 'एआय' तंत्रज्ञानाचा पाया रचला गेला आहे. सध्या जगभरातील डाटा संकलित करण्याचे काम सुरू आहे. शेतकरी आपल्या जमिनीचा कस आणि क्षेत्रफळ पाहून कोणती खते किती प्रमाणात द्यायची, हे 'एआय' कडून मार्गदर्शन घेईल आणि घरात बसून ड्रोनद्वारे शेती करता येईल.

यामुळे नोकऱ्या कमी होणार असल्या तरी आपल्या क्षेत्रामध्ये ज्यांनी दीर्घकाळ काम केलेले आहे आणि ज्यांना नवतंत्रज्ञान शिकण्याची आवड आहे, त्यांना एआय तंत्रज्ञानाचा फायदाच होईल. यावेळी प्रा. अशोक पाटील यांच्यासह रोटरी मिडटाउनचे सदस्य आणि विद्यार्थी उपस्थित होते.